# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## कर आकारणी विभाग

| | |
|---|---|
| आदेशाचे स्वरुप | मालमत्ता कर वसुली बाबत. |
| आदेश क्रमांक | ३२५ , दिनांक ०६/०८/२०२१. |
| विषय | मालमत्ता कराची थकबाकीसह चालु वित्तीय वर्षाची संपूर्ण कराचा भरणा करणाऱ्या करदात्यांकरीता मनपा करावरील लागु असलेली शास्ती व इतर फी (मनपा नोटीस फी व वॉरंट फी) इ. मध्ये सवलत/माफ देणे तसेच चालु वित्तीय वर्षाकरीता चालु मागणीवर शास्ती माफ करणे बाबत. |
| संदर्भ | मा. महापालिका ठराव क्रमांक ७२९ दि. ११/०५/२०२१. |
| कोणाच्या माहितीसाठी | कर आकारणी विभाग/लेखापरिक्षण विभाग/ वित्त व लेखा विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/ विभागीय अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ वसुली सहाय्यक अधिक्षक/ सर्व वसुली लिपीक/ संगणक कार्यप्रणाली देखभाल दुरुस्ती. |

नाशिक महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागा अंतर्गत ६ विभागीय कार्यालयामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शहरातील इमारती व जमिनींवर कर आकारणी करुन मालमत्ता कराची वसुली करणेत येते.

कोविड- १९ च्या प्रादुर्भावात मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने, यावर माहे मार्च-२०२० ते अद्यापपावेतो नाईलाजास्तव शासनास लॉकडाऊनचा कालावधी वाढवीणे व क्रमप्राप्त होत आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी नाशिक शहरात फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ (१ (३) नुसार) संपुर्ण जमावबंदीचे आदेश लागु आहेत. त्यामुळे नाशिक शहरातील उद्योग/व्यवसाय बंद झाल्याने व रोजगार बंद झाल्याने अनेक नागरीकांचा रोजगार बुडाला आहे. अनेकांना पुर्ण पगार मिळत नसल्याने नागरिकांचे आर्थिक स्थितीवर विपरीत झाल्याने, चालु वित्तीय वर्षात मालमत्ता कर वसुली इष्ठांकावर परिणाम झालेला दिसुन येत आहे.

कोविड-१९ या महामारी विरुध्द उपाययोजना करणे आणि सार्वजनिक सेवांचा दर्जा चांगला राखणे अशी दुहेरी जबाबदारी पार पाडणे करीता व विकास कामांना चालना देणे, इत्यादी कामी मालमत्ता कराचे वसुली इष्ठांक १०० टक्के पुर्ण करणे आवश्यक आहे, इत्यादीकरीता उपायोजनांचा भाग म्हणुन थकबाकीदार तसेच चालु वित्तीय वर्षा करीता मागणीधारक यांना मालमत्ता कर वसुल करणेकामी विविध प्रकारच्या योजना/सवलती देणे बाबत मा. लोकप्रतिनिधी मागणी आहे. इत्यादी सर्व बाबी विचारात घेता चालु वित्तीय वर्षामध्ये वसुली इष्टांक पुर्णकरणे करीता करदात्यांना, खालील प्रमाणे महापालिका ठराव क्रमांक ७२९ दि. ११/०५/२०२१ अन्वये खालील प्रमाणे सवलतीची योजना लागु करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४०-अ नुसार महापालिका ठराव क्र. ६७७ दिनांक. ९/०९/२०१९ अन्वये प्रतिवर्षी मालमत्ता करामध्ये अगाऊ कर भरणाऱ्या करदात्यांकरीता चालु आर्थिक वर्षाचे मालमत्ता करांवर माहे एप्रिल -५ टक्के, माहे मे -३ टक्के व माहे जुन-२ टक्के या प्रमाणे सवलत देण्यात येत आहे. मात्र त्याऐवजी सन २०२१-२२ या कालावधी करीता चालु आर्थिक वर्षाचे मालमत्ता करांवर माहे एप्रिल ते मे २०२१ -५ टक्के, माहे जुन २०२१-३ टक्के व माहे जुलै २०२१-२ टक्के येणे प्रमाणे अंशतः बदल करणेस मंजुरी देण्यात येत आहे. तसेच त्यापुढील आर्थिक वर्षाकरीता पुर्ववत सवलत पुढील धोरण लागु असेपर्यंत कायम लागु राहील.

ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची-'ड', प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ४१ अन्वये अदत्त रकमेवर प्रतिमासिक शास्ती आकारणेत येते. तरी चालु वित्तीय वर्षात, माहे एप्रिल-२०२१ ते माहे मार्च-२०२२ पावेतो इ. कालावधी करीता थकबाकी रक्कमेवर तसेच चालु मागणी रकमेवरील प्रतिमासिक शास्ती नियम ५१ अन्वये माफ करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ (१) मध्ये विहित कालावधीमध्ये पात्र असलेल्या व्यक्तीने मालमत्ता कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता,

त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील, या तरतुदीनुसार तसेच नियम ४२ ते ४६ अन्वये अटकावणी अधिपत्रा करीता, नियम ५० नुसार अधिपत्र बजावणी फी आकारण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ अन्वये शास्ती फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल - आयुक्तांस, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खाली फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल, अशी तरतूद आहे.

मालमत्ता कर थकबाकीवर आकारणेत आलेल्या मनपा कर, शास्ती तसेच अटकावणी अधिपत्र मनपा वॉरंट फी व मनपा नोटीस फी मध्ये थकबाकीसह मिळकत कराची संपुर्ण रक्कम एक रकमी भरणा करणाऱ्या मिळकतधारक/भोगवटादारांकरिता सवलत/माफी देणेकामी अभय योजना खालील प्रमाणे.

| अ.क्र | सवलत योजनेचा कालावधी | मनपा कर शास्ती, वॉरंट फी व नोटीस फी देणेची माफी / सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दि. १६ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर - २०२१ | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती रक्कमेचे ९० टक्के |
| २ | दि. १६ ऑक्टोबर ते ३१ नोव्हेंबर-२०२१ | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती रक्कमेचे ७० टक्के |
| ३ | दि. १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२१ | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती रक्कमेचे ५० टक्के |

- योजनेच्या कालावधीपुर्वी अथवा समाप्तीनंतर शास्ती व इतर फीचा भरणा केलेला असल्यास, त्याचा लाभ पुर्वलक्षी प्रभावाने सदर योजने मध्ये लागु होणार नाही अथवा परताव्यासाठी दावा करता येणार नाही.
- उक्त सवलतीच्या कालावधीमध्ये करदात्यांना माहिती व जनजागृती कामी, फलक लावणे, इलेक्ट्रॉनिक व इतर माध्यमे, तसेच रिक्षावर ध्वनिक्षेपक इ. माध्यमांद्वारे करण्यात यावी.
- थकबाकीदार करदात्यांना प्रत्यक्ष माहितीकामी, विभागीय अधिकारी यांनी नियोजन करुन, नोटीसमध्ये योजनेचा उल्लेख करुन, त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधीत कर्मचाऱ्यांकडुन योजना सुरु होणेपुर्वी नोटीस बजावणी पुर्ण करणेत यावी.
- उक्त योजनेचा निश्चित केलेला कालावधीत योजनेची सवलत देणेकामी संगणक कार्यप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावे.

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

Scanned by CamScanner